RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष १२, अंक ७] शुक्रवार, मार्च २७, २०२६/चैत्र ६, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ८**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

### राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ मार्च, २०२६.

### अधिसूचना

क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.०३/का-८.— ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची पूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ च्या कलम १० पोट-कलम (१) खंड(ब) मधील तरतूद पुढीलप्रमाणे आहे — प्रत्येक गाव (राज्य निवडणूक आयोग किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी विहित रितीने) ठरवील अशा प्रभागात विभागण्यात येईल आणि प्रत्येक प्रभागातून निवडावयाची पंचायतीच्या सदस्यांची संख्या (राज्य निवडणूक आयोग किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी विहित रितीने) ठरवील इतकी असेल.

आणि ज्याअर्थी, सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २२, दिनांक ११ मार्च, २०२२ च्या सुधारणेन्वये "महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (ब) मधील "राज्य निवडणूक आयोग" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या मजकुराऐवजी, "राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने राज्य शासन" हा मजकूर दाखल करण्यात येईल."अशी दुरुस्ती करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त सुधारणेन्वये "महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (ब) मधील (प्रभाग रचना व सदस्य संख्या निश्चित करणे) राज्य शासनाचे अधिकार दिनांक १७ जानेवारी २०२३ च्या आदेशान्वये संबधित जिल्हाधिकारी यांना प्रदान केले आहेत.

आणि ज्याअर्थी ग्राम विकास विभागाने दिनांक २२ फेब्रुवारी २०२३ च्या पत्रान्वये प्रभाग रचनेचे सुधारीत टप्पे निश्चित केले आहेत.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० (१) (ब) मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायतीची प्रभाग रचना व सदस्य संख्या निश्चितीस मान्यता देण्याचे राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार दिनांक २३ फेब्रुवारी २०२३ च्या आदेशान्वये **संबंधित विभागीय आयुक्त** यांना प्रदान करण्यात आले आहेत ;

आणि ज्याअर्थी, शासनाने दिनांक २५ मार्च २०२६ च्या शुद्धीपत्रकान्वये, ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेतील सदस्य संख्या निश्चित करणे, प्रभाग रचना करणे बाबतचे दिनांक १७ जानेवारी २०२३ च्या पत्रान्वये संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेले अधिकार उपविभागीय अधिकारी यांना प्रदान केले असून, दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ च्या प्रभाग रचना कार्यक्रमानुसार दिनांक २५ मार्च २०२६ रोजीच्या टप्प्यापर्यंत झालेली कार्यवाही संरक्षित केली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १० अ(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, दिनांक २३ फेब्रुवारी २०२३ च्या अधिसूचनेन्वये ग्रामपंचायत प्रभाग रचना मान्यतेचे संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान केलेले अधिकार रद्द करून, मात्र विभागीय आयुक्त यांनी दिनांक २३ फेब्रुवारी २०२३ च्या आदेशान्वये ग्राम विकास विभागाच्या दिनांक १७ फेब्रुवारी २०२३ च्या प्रभाग रचना कार्यक्रमानुसार केलेली कार्यवाही संरक्षित करुन, शासनाने दिनांक २५ मार्च २०२६ च्या शुद्धीपत्रकामध्ये केलेल्या सुधारणेनुसार, प्रभाग रचना कार्यक्रमाच्या पुढील टप्प्याबाबत राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे :—

| अ.क्र. | प्रभाग रचना कार्यक्रमाचा टप्पा | प्राधिकृत अधिकारी |
|---|---|---|
| | **प्रारुप प्रभाग रचना** | |
| 1 v) | उपविभागीय अधिकारी यांनी नमुना ब (प्रारुप प्रभाग रचना) ची संक्षिप्त तपासणी करणे व त्यात आवश्यक असल्यास दुरुस्त्या करुन सदर प्रारुप राज्य निवडणूक आयोग किंवा त्याने प्राधिकृत केलेला सक्षम अधिकारी यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करणे | जिल्हाधिकारी |
| 1 vi) | राज्य निवडणूक आयोग किंवा त्याने प्राधिकृत केलेला सक्षम अधिकारी यांनी आवश्यक असल्यास प्रस्तावात दुरुस्ती करणे व त्यास मान्यता देणे | जिल्हाधिकारी |
| | **प्रारुप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना** | |
| २ v) | आलेल्या प्रत्येक हरकती व सुचनांवर सुनावणी नंतर अभिप्राय नोंदवून अंतिम निर्णयासाठी प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे सादर करणे | जिल्हाधिकारी |
| | **प्रभाग रचना अंतिम करणे** | |
| 3 i) | उपविभागीय अधिकारी/उपजिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले प्रस्ताव तपासून राज्य निवडणूक आयोग अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकारी यांनी प्रभाग रचना अंतिम करावी. | जिल्हाधिकारी |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**सुरेश काकाणी,**
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.